जा.क./ १९३५/२०२४
जिल्हा न्यायालय, अमरावती
दिनांक :- २०/०६/२०२४.

प्रति,

~~नोटीस बोर्ड~~

~~जिल्हा व सत्र न्यायालय~~

~~अमरावती~~.

**विषय** :- सीसीटीव्हीचा वार्षिक देखभाल कराराकरीता बंद निविदा मागविणेबाबत........

**संदर्भ** :- दि.१७/०६/२०२४ च्या कार्यालयीन टिप्पणीनुसार.

महोदय,

वरील संदर्भांकित टिपणीस अनुसरून वि. वि. जिल्हा न्यायाधीश -३, अमरावती यांचे आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय, अमरावती येथे सन २०१८ मध्ये नविन इमारतीमधे न्यायालयीन/कार्यालयीन कामकाजाची सुरुवात झाली. त्यावेळेस सदर इमारतीमधे एकुण ८० सीसीटीव्ही कॅमेरे स्थापीत करण्यात आले होते. सद्यस्थितीत सदर सीसीटीव्ही युनीट कोणत्याही वारंटी/देखभाल करार नसल्यामुळे देखभाल करार करणे गरजेचे आहे.

त्या अनुषंगाने सदरहु सीसीटीव्ही युनीट चा वार्षिक देखभाल करार दिनांक ०१/०७/२०२४ ते ३०/०६/२०२५ पर्यत दयायचा आहे. करीता, वार्षिक देखभाल कराराबाबत निविदा बंद पाकीटात दिनांक २९/०६/२०२४ पुर्वी सायंकाळी पाच वाजेपर्यंत जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती येथे पाठवावी.

आदेशानुसार
19-6-2024
का.प्र. (आर.व्ही.ताम्हाणेकर)
जिल्हा न्यायाधीश-३
अमरावती

**सोबत** :- सीसीटीव्हीची माहिती व शर्ती अटीसह..

# District & Sessions Court, Amravati.

## CCTV UNIT INFORMATION

| S.N. | CCTV INFORMATION | QUANTITY |
|---|---|---|
| 1 | NVR UNIT | 03 |
| 2 | CCTV CAMERA | 80 |
| 3 | NETWORK SWITCH | 08 |
| 4 | UPS | 05 |

# सीसीटीव्ही युनीटचा वार्षिक देखभाल/दुरूस्तीबाबतच्या शर्ती व अटी

| | |
|---|---|
| १ | मोहोरबंद निविदा हया प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांचे नावाने जिल्हा न्यायालय, कॅम्प, अमरावती—४४४६०२ या पत्त्यावर दिनांक २९/०६/२०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारल्या जातील. सायंकाळी ५.०० वाजता नंतर आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाही. |
| २ | सदर्हु निविदा सुचनेत नमुद सीसीटीव्ही युनीटचा देखभाल करार कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही क्षणी अथवा संपुर्णत: वगळण्याचे अधिकार हे मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांनी राखुन ठेवले आहे. |
| ३ | कोणतीही एक अथवा सर्व निविदा कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांनी स्वत:कडे राखुन ठेवले आहे. |
| ४ | सीसीटीव्ही युनीटचा वार्षिक देखभाल/दुरूस्ती करार अमरावती येथील न्यायालयात प्रतिष्ठापित केलेल्या सीसीटीव्ही युनीट करीता राहील |
| ५ | करार झाल्यावर आपल्या कंपनीला/अभियंत्याकडे सीसीटीव्ही युनीट दुरुस्ती बाबत तक्रार दिली असता त्यांना सदरहु तक्रार २४ तासाचे आत हजर राहुन दुरुस्ती करुन दयावी लागेल. |
| ६ | सीसीटीव्ही युनीट दुरुस्ती मध्ये सुटे भाग दुरुस्ती करीता नेल्यास दोन दिवसाचे आंत सदरहु सुटे भाग दुरुस्त करुन जोडणी करुन दयावी लागेल. दुरुस्तीला विलंब लागत असल्यास त्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था करुन दयावी लागेल. |
| ७ | सीसीटीव्हीचे अवलोकन करुनच निविदा सादर करण्यात यावी. |
| ८ | निविदा मंजुर झालेल्या कंपनीला १००/— रुपयाचे बॉन्डपेपरवर आपला करार करुन दयावा लागेल व सदरहु १००/— रुपयाचा बॉन्डपेपरचा खर्च कंपनीला सोसावा लागेल. |
| ९ | वार्षिक देखभाल/दुरुस्ती करारावर राज्य व केंद्र सरकारचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर निविदा मंजुर झालेल्या कंपनीला सोसावे लागेल. |
| १० | सीसीटीव्ही युनीटचा व्यापक (Comprehensive) लॅन केबलसह देखभाल / दुरुस्ती राहील. |
| ११ | देयक हे त्रैमासीक पध्दतीने त्रैमासीक संपल्यानंतर सादर केल्यावर नियमानुसार अदा करण्यांत येईल. |
| १२ | देयक हे द्विप्रतीत संपुर्ण तपशीलासह या कार्यालयात सादर करावे लागेल. |
| १३ | राज्य व केंद्र सरकारचे सर्व कर वगळुन देयक अदा करण्यांत येईल |
| | करारानुसार व अटीचे उल्लंघन केल्यास कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही क्षणी कुठलीही सबब न देता आपला वार्षिक देखभाल/दुरुस्ती करार संपुर्णत: रद्द करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांना राहील. |

19-6-2024

(आर.व्ही.ताम्हाणेकर)
जिल्हा न्यायाधीश-३
अमरावती